# जाहिरात

## महाराष्ट्र शासन

## वनविभाग

**प्रादेशिक निवड समिती, चंद्रपूर वनवृत्त**

**(उपवनसंरक्षक,मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर यांचे कार्यालय,मुल रोड,चंद्रपूर-४४२४०१)**

---

**चंद्रपूर वनवृत्तातील गट-क संवर्गातील वनरक्षकाची रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात क्रमांक कक्ष- ३/आस्था/प्र.क्र. /१६-१७/१७११ दिनांक- २१/०९/२०१६**

---

चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर अधिपत्याखालील गट -क संवर्गातील वनरक्षक पदासाठी **महाराष्ट्र राज्याचा रहिवासी** असलेल्या उमेदवारांकडुन **Online** पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन पध्दतीने करावयाचा विहित अर्ज मे.महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेच्या **https://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहीत अर्ज (online) भरण्यापुर्वी उमेदवाराने संपुर्ण जाहिरात व अनुषंगिक सुचना काळजीपुर्वक वाचुन वर नमुद संकेतस्थळावरच ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.

**जाहीरात** http://maharecruitment.mahaonline.gov.in **तसेच www.mahaforest.nic.in व www.ccfchanda.org या संकेत स्थळावर देखील उपलब्ध आहे.**

उपरोक्त संवर्गातील रिक्त पदसंख्या,त्या पदाकरिता शासनाने विहित केलेली वेतनश्रेणी आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता/अनुभव/शारीरीक पात्रता/वयोमर्यादा इत्यादीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**१) संवर्ग:-वनरक्षक**

**१.१ वेतनश्रेणी :-** ( वेतनबॅन्ड PB-१ रु.५२०० - रु.२०२००, ग्रेड पे - रु.१८०० )

महाराष्ट्र शासन अधिसुचना RB/TC/e-१३०१३/Notification-१/४७४/२०१४ दि.९.६.२०१४ चे अनुषंगाने जारी केलेली अधिसूचना क्रमांक आरबीटीसी/ई-१३०१३(४)/नोटीफीकेशन-२/४७४/२०१४/७३० दि.१४ ऑगस्ट २०१४ अन्वये " अनुसुचित क्षेत्रातील वनरक्षक हे पद केंद्र शासनाच्या दिनांक २ डिसेंबर १९८५ च्या अधिसुचनेमध्ये नमुद जिल्हा,तालुका व गावातील स्थानिक अनुसुचित जमातीच्या उमेदवारातून भरण्याबाबत शासन आदेश आहेत.चंद्रपूर वनवृत्तांतर्गत मध्य चांदा वनविभागातील **राजुरा,जिवती व कोरपना तालुका** अनुसुचित क्षेत्रात येत असल्यामुळे वनरक्षकाची अ) मध्ये नमुद केल्याप्रमाणे रिक्त असलेली केवळ राजुरा,जिवती व कोरपना तालुक्यातील अनुसुचित क्षेत्रातील स्थानिक अनुसुचित जमातीचे उमेदवारामधुन ज्यांचे वाडवडील ,आजोबा हे दिनांक २६.१.१९५० पासुन राजुरा,जिवती व कोरपना तालुक्यातील अनुसुचित क्षेत्रातील गावामधील वास्तव्यास आहे अशा उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

**अ) वर्ष २०१६ मधील अनुसुचित क्षेत्रातील सरळसेवा भरतीकरिता रिक्त पदसंख्या-०१ पदे**

| वनविभागाचे नाव | अनुसुचित क्षेत्र तालुक्याचे नाव | एकुण पदांची संख्या | १/३ महिला आरक्षण पदाची संख्या |
|---|---|---|---|
| मध्य चांदा | राजुरा,जिवती व कोरपना | ०१ | ० |

**अनुसुचित क्षेत्रातील उमेदवारांकरिता विशेष टिप-**

- उमेदवार चंद्रपूर जिल्हयातील **राजुरा,जिवती व कोरपना** तालुक्यातील अनुसुचित क्षेत्रातील गावामध्ये दिनांक २६.१.१९५० पासून उमेदवाराचे पंजोबा,आजोबा,वडील (कुटुंबाचे) वास्तव्य असावे. ज्या उमेदवाराचे कुटुंबाचे वास्तव्य वर नमुद दिनांकानंतरचे असेल त्यांचा अर्ज पात्र ठरणार नाही. उमेदवाराने दिनांक २६.१.१९५० पासून चंद्रपूर जिल्हयातील राजुरा,जिवती व कोरपना तालुक्यातील अनुसुचित क्षेत्रातील वास्तव्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे. सदर पुरावा सादर करतांना महसुली अभिलेख (पी-१,पी-३,पी-९ तसेच नातेसंबंध स्पष्ट करणारी वंशावळ) तसेच वास्तव्य सिध्द होणारे इतर आवश्यक पुरावे सादर करणे आवश्यक आहे. दिनांक २६.१.१९५० पासून वास्तव्य असल्याचे उमेदवाराने पुरावा सादर न केल्यास किंवा वास्तव्य सिध्द न झाल्यास उमेदवार अपात्र ठरेल.
- अनुसुचित क्षेत्रातील उमेदवारांकरीता ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केली आहे. (इयत्ता १० वी ) असेच उमेदवार पात्र ठरतील ( शासन अधिसूचना महसुल व वनविभाग दिनांक ३० जून २०११ अन्वये शैक्षणिक अर्हता शिथीलक्षम केल्याप्रमाणे )
- अनुसुचित क्षेत्रातील उमेदवारांकरिता शारिरीक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे शिथिलक्षम राहील
  **उंची:- पुरुष-१५२.५ से.मी. महिला-१४५ से.मी.**
- उपरोक्त अनुसुचित क्षेत्रातील गावांची यादी उपरोक्त नमुद संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेली आहे.

**घ) वर्ष २०१६ मधिल उर्वरित क्षेत्रातील (अनुसुचित क्षेत्र वगळून) सरळसेवा भरतीकरीता रिक्त पदसंख्या :- २० पदे**

| अ.जा. | अ.ज | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | ०३ | ० | ० | ० | ० | ०५ | ०१ | ११ | २० |

**वरील उल्लेखित पदांकरीता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.**

| विशेष/समांतर आक्षण | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला | ० | १ | ० | ० | ० | ० | २ | ० | ३ | ६ |
| प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ |
| अति. उच्च खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| होमगार्ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| अधिसंख्य वनमजूर | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ४ |
| **एकुण** | **०** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **५** | **१** | **११** | **२०** |

**विशेष टिपः-**

- जाहिरातीत नमूद केलेल्या पदसंख्या वर्षभरात रिक्त होणा-या पदावर आधारीत असल्याने सदर नियुक्ती या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच जाहीरातीत उल्लेख केलेल्या पदसंख्येत,सामाजिक व समांतर आरक्षणात भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर बदल होऊ शकतो.
- रिक्त पदांची प्रवर्गनिहाय व एकुण संख्या परिवर्तनीय असुन त्यामध्ये वाढ किंवा घट होवू शकते.
- कोणत्याही प्रकारचे अपंगत्व असणारे उमेदवार यांनी उपरोक्त पदाकरिता अर्ज करु नये.

२.२ **शैक्षणिक पात्रता :-**

महाराष्ट्र शासन,महसुल व वनविभागाकडील अधिसूचना क्र.एफएसटी-१२/१३/प्र.क्र.६५१/फ-४ दि.१३ मे २०१५ च्या अधिसूचनान्वये,उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी ) विज्ञान किंवा गणित किंवा भुगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह उत्तीर्ण केलेली असावी. समकक्ष परिक्षेबाबतची यादी **महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००४२९१७०९४६००१ असा आहे.**

**२.२.०३** जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, चंद्रपूर / नागपूर यांनी असे स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६-अ, दि.५ ऑक्टोबर, १९८९ नुसार एसएससी पास माजी सैनिकांना ज्यांची सैन्य सेवा १५ वर्ष झालेली आहे, त्यांना ज्या पदासाठी पदवी ही पात्रता आवश्यक आहे, त्या ठिकाणी ग्राहय धरण्यात येईल. वनविभागाव्दारे करण्यात येत असलेल्या वनरक्षकांच्या पदांच्या भरतीमध्ये ज्याकरीता १२ वी ही शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे, त्याकरीता एसएससी पास आणि कमीत कमी १५ वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्या जवळ सैन्यसेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे, असे माजी सैनिकांना वनरक्षक पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

**२.२.०४** शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार,व नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनरक्षक व वनकर्मचा-यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी)उत्तिर्ण केली असल्यास या पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

टिप :- **नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनरक्षक व वनकर्मचा-यांचे संबंधात वरील प्रयोजनाकरीता शासकीय वैद्यकिय अधिकारी आणि पोलीस खात्यातील घटनेच्या कार्यक्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकारी यांचेकडून निर्गमीत केलेले प्रमाणपत्र विचारार्थ घेण्यात येईल.**

३.०० वयोमर्यादा :-

३.३.०१ वरिल पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे वय **दि.२६ सप्टें. २०१६** रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल २५ वर्षापेक्षा जास्त नसावे.(मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या धोरणानुसार उच्चतम वयोमर्यादेत सुट देय राहील.)

३.३.०२ **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.**

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

(दोन) **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र.मासेक-१०-१०/प्र.क्र.२७१/१०/१६-अ. दि.२० ऑगष्ट, २०१० अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष इतकी राहील."**

(तीन) पात्र खेळाडुच्या बाबत ५ वर्षापर्यंत

(चार) प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

(पाच) वनविभागातील अधिसंख्य वनमजूरांना महसूल व वनविभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक एलएसी १०९४/ प्र.क्र.२५२/फ-९, दिनांक ३१-७-२००३ नुसार वयोमर्यादेसंबंधी अट शिथिलक्षम.

(सहा) पदविधर/पदविकाधारक अंशकालिन उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

४.०० **शारिरिक अर्हता:-**

४.०१ **वनरक्षक पदासाठी खालील तक्त्यात नमुदप्रमाणे किमान शारीरिक अर्हता आवश्यक आहे.**

| शारीरिक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |
| (अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम) | | |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

४.०२ दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

**दूरदृष्टी**

| अधिक चांगला डोळा (सुधारलेली दृष्टी) | वाईट डोळा |
|---|---|
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

**जवळील दृष्टी**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| J.१ | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

४.०३ शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या विशेषतज्ञांकडुन वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल.वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा,रंग व रात आंधळेपणा,आतल्या बाजुला फेंगाडे असलेले गुडघे,सपाट पाय,त्वचा व छातीचे रोग या संबधीचा आणि या व्यतिरिक्त अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) म.रा.नागपूर यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

४.०४ शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनरक्षरे व वनकर्मचा-यांचे मुलांना खाली नमूद केल्याप्रमाणे सुट देण्यात येईल.

१) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी.
२) छाती :- मोजणी आवश्यक नाही.

४.०५ **खेळाडू प्रवर्ग :-** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पुर्ण करणा-या खेळाडूना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

४.०६ **वनकर्मचा-यांचे पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलत:-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचाऱ्यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

(ए) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.
(बी) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ से.मी.फुगवून.

४.०७ **किमान सापेक्ष ऊंची, वजन व छातीची मोजमापे :-**

**शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.२४/८/२०११**

**उपरोक्त शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-१९८१ मधील परिशिष्ठ-३ मध्ये महाराष्ट्र वनसेवेतंर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहीत केलेल्या उंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही उंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील.वैद्यकीय तपासणी करणा-या व्यक्तीच्या मार्गदर्शनाकरिता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष उंची,वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमुद आहे.त्याप्रमाणे कार्यवाही होईल.**

५.०० वनरक्षक पदाची निवड पध्दत:-

५.०१. उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते विहीत शैक्षणिक पात्रता,वयोमर्यादा व विशेष सुट करिता दावे इत्यादींची पुर्तता करतात किंवा कसे? याची शहानिशा करण्यात येईल.

५.०२.वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारिरीक पात्रता धारण करतात किंवा कसे? हे निश्चित करण्याच्या दृष्टिने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

५.०३. जे उमेदवार किमान शैक्षणिक पात्रता,वयोमर्यादेची अट तसेच किमान शारिरीक पात्रता धारण करतात त्या पात्र उमेदवारांची शारीरीक क्षमता चाळणी चाचणी घेण्यात येईल.

६.०० **धावण्याची चाचणी परिक्षा :-**

६.०१ शारिरीक पात्रतेत पात्र असलेले **(उपरोक्त निकषानुसार)** उमेदवार धावण्याची चाचणी परिक्षेकरिता पात्र ठरतील.

६.०२ उमेदवार हा शारीरिक क्षमता चाळणीकरिता शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित उमेदवारांनी शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडुन प्राप्त करुन घेवुन धावण्याच्या चाचणी परिक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

६.०३ शारिरीक पात्रता परिक्षेत पात्र उमेदवाराची धावण्याची चाचणी परिक्षा घेण्यात येईल.

**( पुरुष ५ किमी / महिला ३ किमी )**

**धावण्यांची चाचणी परीक्षा पुरुष उमेदवारांनी ५ कि.मी. व महिला उमेदवारांनी ३ कि.मी.जास्तीत जास्त ३० मिनिटामध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील. ही चाचणी परीक्षा स्पर्धात्मक स्वरुपाची असुन यामधील गुण पुढील प्रमाणे राहतील. (उपसचिव महसुल व वनविभाग यांचे पत्र क्रं.एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४ दि.२१ जुलै २०१४ अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| **क्रमांक १ ते ३ वरिल आलेले** | - | **यांना प्रत्येकी १० गुण.** |
| **क्रमांक ४ ते ८ वरिल आलेले** | - | **यांना प्रत्येकी ०८ गुण.** |
| **क्रमांक ९ ते १५ वरिल आलेले** | - | **यांना प्रत्येकी ०६ गुण.** |
| **क्रमांक १६ ते २५ वरिल आलेले** | - | **यांना प्रत्येकी ०४ गुण.** |
| **क्रमांक २६ ते ४० वरिल आलेले** | - | **यांना प्रत्येकी २.५ गुण.** |
| **क्रमांक ४१ वरिल आलेले** | - | **यांना ० गुण.** |

पुढील टप्प्यातील उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहित करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल.व भरावयाच्या पद संख्येच्या तीनपट (१:३) एवढेच उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरतील

**७. शैक्षणिक प्रमाणपत्र तपासणी**

७.१ धावण्याच्या चाचणी परीक्षेत पात्र उमेदवाराची मुळ प्रमाणपत्रानुसार तपासणी करण्यांत येईल. प्रचलित भरती नियमाच्या अनुषंगाने उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये नमुद केलेल्या बाबींची शहानिशा करण्यात येईल.

७.२ त्यावेळेस आवश्यक दस्ताऐवजाच्या मुळ प्रतीसह छायांकीत प्रतीचा एक संच सोबत आणणे आवश्यक राहील.

७.३ शासनाव्दारे घोषित नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनरक्षक व अशा वनकर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी इयत्ता १० मधील (माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा) एकुण गुण विचारात घेवून गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल. इयत्ता १० वी / १२ वी मधील गुणांना ८७.५ % एवढे भारांकन **(Weightage)** देण्यात येईल. (टीप: १० वी/१२वी/तत्सम समकक्ष परिक्षेत एकापेक्षा जास्त संधीत उत्तीर्ण झाले असेल तर त्या प्रत्येक परीक्षेचे गुणपत्रक (मार्कलिस्ट) निवड चाचणीच्या वेळी समक्ष आणणे आवश्यक आहे अशी सर्व गुणपत्रके न आणल्यास असा उमेदवार अपात्र समजला जाईल.)

**८.० शारिरीक क्षमता चाचणी:-**

**८.१ शैक्षणिक प्रमाणपत्र तपासणीनंतर पात्र झालेल्या उमेदवाराची शारीरीक क्षमता चाचणी -**

**अ)** पुरुषांकरिता २५ कि.मी. व महिलांकरिता १६ कि.मी. ४ तासात चालण्याची चाचणी घेण्यात येईल.

**ब)** उमेदवार हा शारीरिक क्षमता चाचणीकरीता शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित उमेदवारांनी शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडुन ओळखपत्रामध्ये नमुद केलेल्या प्रपत्रात प्रमाणपत्र प्राप्त करुन चाळणी परिक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

**क)** जे उमेदवार ४ तासात चालण्याची चाचणी पुर्ण करणार नाहीत असे **उमेदवार सदर भरती प्रक्रीयेत अपात्र ठरवण्यात येतील.**

**९.० गुणवत्ता यादी**

**९.०१** शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणाच्या टक्केवारीचे ८७.५% केलेले भारांकन व १२.५% भारांकन करिता ५ कि.मी. व ३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण याची बेरीज करुन उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

**उदा.**श्री क या उमेदवाराने शैक्षणिक अर्हता परिक्षा (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा विज्ञान/गणित/भुगोल/अर्थशास्त्र) मध्ये एकुण निर्धारित ५०० गुणांपैकी ३०० गुण प्राप्त केलेले आहे,त्याची टक्केवारी ६०% येईल,त्याचे ८७.५% भारांकन म्हणजे ५२.५० एवढे येईल. तसेच ५ कि.मी./३कि.मी.धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे,तर उर्वरित १२.५ भारांकन करिता त्यांना दि.२१/०६/२०१४ च्या शासन पत्रानुसार १२.५ पैकी ८ गुण मिळतील. याप्रमाणे गणना करुन अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

९.०२ वरीलप्रमाणे गणना केल्या नंतर एकुण गुण एकत्रित करुन सामाजिक व समांतर आरक्षणानुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

**१०.०० निवड प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन नोंद ( रजीस्ट्रेशन ) करण्याचा कालावधी | दि.२६-०९-२०१६ ते दि.१७-१०-२०१६ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होणा-या चालानव्दारे भरण्यात येणारे सेवाशुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) च्या कोणत्याही शाखेमध्ये भरणा करण्याची अंतिम तारिख | दि.१८-१०-२०१६ रोजी बँकेच्या व्यवहार · वेळेपर्यंत |
| ३ | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारिख | दि.१७-१०-२०१६ सोमवार |

**१०.०१** i) शारीरीक पात्रता तपासणीचे स्थळ आणि वेळ. :- Maha online व चंद्रपूर वनवृत्ताच्या वेबसाईटवर तसेच मुख्य वनसंरक्षक चंद्रपुर/उपवनसंरक्षक,मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल.

ii) शारीरीक क्षमता चाचणीचे स्थळ आणि वेळ :- वरिल प्रमाणे

निवड प्रक्रीयेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास तसेच वनरक्षक भरतीसंदर्भात आवश्यक सुचना वेळोवेळी https://maharecruitment.mahaonline.gov.in व www/mahaforest.nic.in व www.ccfchandrapur या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. ( याबाबत वेगळयाने पत्रव्यवहार केला जाणार नाही.)

१०.०२ प्राप्त अर्जाच्या छाननी नुसार पात्र उमेदवारांच्या धावण्याच्या चाचणी परिक्षेचा कार्यक्रम उपरोक्त संकेतस्थळावर व कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल

**११.०० सर्वसाधारण अटी :-**

११.०१ सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

११.०२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचे कायमचा रहिवासी असावा.

११.०३ "महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७/८/२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून आरक्षणाअंतर्गत भुकंपग्रस्तासाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागु राहील"

११.०४ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१३-अ दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाचा प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा.,अ.ज., वि.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि इतर प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणा-या राखीव पदाची संख्या पदाच्या तपशिल या शिर्षातंर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर आरक्षणाची पदे त्या त्या सर्वसाधारण /सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येईल.

११.०५ वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारांसाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६/प्र.क्र.१५/ मावक-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारित नमुण्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे **(नॉन- क्रिमीलेअर)** निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर सुधारित प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारल्यास योग्य समजला येईल. तसेच वि.मा.प्र-अ व शै.शा.मा.प्र.यांना सुध्दा वरिलप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक राहील.

खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति / गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

११.०६ महिला आरक्षणा करिता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारानी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११.०७ खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू उमेदवारांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

११.०९ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादि कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर **ONLINE** पध्दतीने उपरोक्त नमुद संकेत स्थळावर जावून आपला अर्ज सादर करावा.

११.१० वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजूरानी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहेत त्या पदाकरिता **ONLINE** पध्दतीने उपरोक्त नमुद संकेत स्थळावर जावून आपलाअर्ज सादर करावा.

११.११ अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियत कालीक, अंशकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

११.१२ पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे **या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.**

११.१३ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

११.१४ उमेदवारांना प्रथम धावण्याची परीक्षा व शारिरीक क्षमता चाचणी करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

११.१५ वनविभागातील वनरक्षक या पदावर नियुक्ती करतांना एकुण ५ % पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी ३ वर्ष इतकी सेवा झालेल्या व वनरक्षक पदासाठी आवश्यक शैक्षणिक / शारिरीक पात्रता पुर्ण करणा-या विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डस मधून भरण्यात येतील.**सदर अटीची पूर्तता न केल्यास त्याला गृहरक्षक (होमगार्ड) पदाचे आरक्षण लाभ देय होणार नाही.**

११.१६ "सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करून सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल."

११.१७ वनविभागात रोजंदारीवर मजुरांनी सलग किंवा तुटकतुटक प्रत्येक वर्षी किमान २४० दिवस सतत ५ वर्ष पुर्ण करणारे रोजंदारी वनमजुर महसुल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक बैठक-२०१०/प्र.क्र./फ-९ दि.१६ ऑक्टोबर २०१२ नुसार १० टक्के आरक्षणासाठी पात्र आहेत व अशा उमेदवाराकरिता ४६ वर्षापर्यंत वयोमर्यादेत सुट देण्यात आली आहे. सदर सवलतीसाठी उमेदवारांनी संबधित उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र सादर करावे. प्रमाणपत्रामध्ये ज्येष्ठतायादीतील अनुक्रमांक नमुद असणे व अर्जाचे तारखेस-उमेदवार वनविभागात कार्यरत असल्याचे नमुद असणे अनिवार्य आहे.

**११.१८ खेळाडु आरक्षणाचा ला भ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.३० एप्रिल २००५ व त्यानंतर शासनाने याबाबत वेळोवेळी दिलेल्या आदेशामध्ये नमुद केलेल्या क्रिडा प्रकारासाठी खेळाडु उमेदवारांकडे खेळाडु प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

**टिपः-१) खेळाडुच्या प्रमाणपत्रांचा दर्जा केवळ क्रिडा संचलनालय,पुणे यांच्याकडुन (त्यांच्या प्रतिनिधींकडुन नव्हे) तपासून घेणे आवश्यक असल्याने अन्य कोणत्याही प्राधिका-याकडुन तपासून घेतलेले खेळाचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.**

**२) खेळाडु प्रवर्गाचा लाभ मिळण्यासाठी उमेदवाराने सादर केलेली क्रिडा विषयक प्रमाणपत्र संचालक,क्रिडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे अंतिम तपासणीसाठी पाठविण्यात येतील व तपासणी अंती सदर प्रमाणपत्र वैध ठरल्यासच त्यांना नियुक्ती देण्यात येईल.**

११.१९ उमेदवारांना ओळखपत्र, लहान कुटुंबासंबधी प्रमाणपत्र ( नमुना-अ),वचनपत्राचा नमुना व उमेदवारांनी स्वाक्षरी करावयाचे नमुने **https://maharecruitment.mahaonline.gov.in** **तसेच** **www.mahaforest.nic.in** व **www.ccfchandrapur.com** या संकेतस्थळावर प्राप्त करुन घ्यावे.

१२.० उमेदवारांना विशेष सुचना

१२.०१.उमेदवाराने वय,शैक्षणिक अर्हता,मागासवर्गीय तसेच क्रिमीलेअर,महिला,माजी सैनिक,खेळाडु,गृहरक्षक दल,अंशकालीन उमेदवार इत्यादी संदर्भात न चुकता स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबधित दाव्याचा विचार केला जाणार नाही.

१२.०२.शारीरीक व धावण्याच्या चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची छाननी करण्यात येईल.प्रमाणपत्रांच्या छाननीच्या वेळी उमेदवाराने लागु असलेल्या प्रमाणपत्रांची मुळ (Orignal) व सुस्पष्ट दिसतील अशा साक्षांकीत केलेल्या दोन छायांकीत प्रती कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१२.०३.उमेदवारानी वनरक्षक भरतीकरिता येताना सोबत वनरक्षक भरतीचे प्रवेशपत्र आणावे. विहीत नमुन्यातील वनरक्षक भरती प्रवेश पत्राशिवाय वनरक्षक भरतीच्या कोणत्याही टप्प्यावरील चाचणीस/तपासणीस प्रवेश दिला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन विचारात घेतले जाणार नाही.

**१२.०४. उमेदवार मागासवर्गीय असुनही खुला प्रवर्ग ( Unreserved) म्हणून अर्ज सादर करतात. परंतु कागदपत्र पडताळणीच्या वेळी जातीचे प्रमाणपत्र/नॉन क्रिमेलिअर प्रमाणपत्र सादर करुन मागास प्रवर्गाचे लाभ मिळण्याबाबत अर्ज सादर करतात. यास्तव ऑनलाईन अर्ज सादर करण्यापुर्वीच त्यांनी कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरावयाचा आहे हे निश्चित करुन नंतरच ऑनलाईन अर्जात तशी माहिती नोंद करावी व संबधित प्रवर्गाचा निर्विवाद दावा अर्ज भरताना करावा. नंतर प्रवर्ग बदलण्याबाबत उमेदवारांकडुन अभिवेदन अथवा दावा/तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

१२.०५. भरती प्रक्रियेदरम्यान दिलेल्या तारीख व वेळी उमेदवार गैरहजर राहिल्यास त्यांना भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.सदर चाचणीसाठी कोणत्याही कारणासाठी किंवा परिस्थितीत पुढील तारीख दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२.०६ कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केल्याची प्रिंट,प्रवेशपत्र व ४ पासपोर्ट साईज अलीकडील फोटो सोबत आणणे आवश्यक आहे.

१२.०७.भरती प्रक्रीया सुरु असताना किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे/प्रमाणपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

१२.०८. सदर भरतीच्या नियम निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना/निर्णय /परिपत्रक/पत्रानुसार बदल झाल्यास त्या त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल ती सर्वांवर बंधनकारक राहील.

१२.०९. वनरक्षक पदावर निवड झालेल्या उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी व पूर्व चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय नियुक्ती देण्यात येणार नाही.

१२.१०. उमेदवारास स्वत:ची ओळख पटविण्यासाठी शासनमान्य ओळखपत्र चाचणीच्या वेळी सोबत आणावे लागेल.

१२. ११. वनरक्षक भरती प्रक्रीयेच्या दरम्यान उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत:जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

१२.० सेवाशुल्क :-

वनरक्षक पदासाठी **ONLINE** पध्दतीने अर्ज करण्यासाठी **शासन परिपत्रक क्र.प्रानिमं:१११४/२८९/(प्र.क्र.१०८/१४)/१३-अ ,दिनांक ११ मार्च २०१५ अन्वये खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने पदासाठी रु.३००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवाराने रुपये १५०/-** ONLINE पध्दतीने प्राप्त होणा-या चालानव्दारे **स्टेट बँक ऑफ इंडिया** च्या कोणत्याही शाखेमध्ये जाऊन भरणा करावा व चालानची प्रत अर्जदाराने जपून ठेवावी किंवा क्रेडिट कार्ड/ डेबिट कार्ड ने सुध्दा ऑनलाईन सेवा शुल्क भरता येईल. अशा प्रकारे सेवा शुल्क रक्कमेचा भरणा केल्यास त्याची पोचपावती प्रत वनविभागाने मागणी केल्यास ती सादर करणे आवश्यक राहील.

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०७१/०/४८२/१६-अ, दिनांक ३ जुलै, १९८० मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये माजी सैनिकांना परिक्षा फी मधुन सुट दिलेली आहे.**

**१३.०० अर्ज सादर करण्याची पध्दत :-**

**१३.०१. प्रस्तुत परिक्षेसाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने दिनांक २६/०९/२०१६ ते १७/१०/२०१६ पर्यंत स्विकारण्यात येतील.**

**१३.०२.** https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळाव्यतिरिक्त इतर संकेतस्थळाचा वापर केल्यास त्याला प्रादेशिक निवड समिती व महाऑनलाईन जबाबदार राहणार नाही.

**१३.०३.** उमेदवाराने जाहीरात काळजीपूर्वक वाचावी.ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर"Apply Online" या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटणवर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी.अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली उमेदवाराला लॉगिन आयडी आणि पासवर्ड निर्माण उमेदवारास स्क्रिनवर दाखवेल.याची प्रिंट काढण्याची सुविधा उपलब्ध आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवराने स्वत:चा अद्ययावत फोटो (रुंदी ३.० से.मी.X उंची ४.५ से.मी. ) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी ३.०से.मी.X उंची २.५ से.मी.) आणि ३००DPI Resolution आणि ५०KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

**(टिप: फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी)प्रवेश पत्रावर/अर्जावर दुस-याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.**

**१४.० परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खालील नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.**

१४.०१. उमेदवाराने भारतीय स्टेट बँकेत चालानव्दारे,नेट बँकींग,डेबिट कार्ड/क्रेडीट कार्ड परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता खालील पध्दतीचा अवलंब करावा.

१४.०२ युजर नेम व पासवर्ड ची नोंद करुन लॉग इन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील"माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे. (२) "माझे खाते" या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नांव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर Unpaid असे लिहीलेले असेल. त्या ठिकाणी Pay Now अशी लिंक उपलब्ध असेल (३) Pay Now या लिंकवर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील.(१) ऑनलाईन पेमेंट (२) चलनाव्दारे (३) उमेदवाराने क्रेडीट कार्ड,डेबीट कार्ड,अथवा नेट बँकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील. उपरोक्त कार्यवाही,अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापुर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील. (४) उमेदवाराने चलनाव्दारे हा पर्याय निवडल्यास,उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत,बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. (५)चलनाव्दारे शुल्क स्विकारण्याकरिता भारतीय स्टेट बँक उमेदवारांकडुन सेवा शुल्काव्यतिरिक्त बँकेचे सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाव्दारे शुल्क भरतांना सेवा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील. (६) **ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करण्याच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.**

१४.०३. उमेदवाराने प्रिंट चलन या बटणावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर उमेदवाराने त्याच्या प्रवर्गानुसार परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकाच्या कोणत्याही शाखेत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वरिल नमुद प्रमाणे विहीत मुदतीत भरणे आवश्यक राहील व याची एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे जपून ठेवावी.

**किंवा**

उमेदवारांनी इंटरनेट बँकिंग अथवा क्रेडिट/डेबिट कार्ड व्दारे त्यांच्या प्रवर्गानुसार परिक्षा शुल्क विहीत मुदतीच्या आत भरावे.

१४.०४.फी भरल्यानंतर उमेदवाराने" अर्ज भरा" या लिंकवर क्लिक करुन, आपला उर्वरित अर्ज भरुन पूर्ण करावा. अर्ज भरताना उमेदवाराने स्वतःचा पासपोर्ट साईजमधील फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वतःकाढावी व कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करण्यासाठी जतन करुन ठेवावी.

१४.०५.विहित मुदतीत परिक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१४.०६.उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वतःचा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी काळजीपुर्वक भरावा.

१५.०० **निवडसुचीची कालमर्यादा:-**

**निवडसमितीने तयार केलेली निवडसुची १ वर्षासाठी किंवा नवीन सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल,त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहिल.** त्यानंतर ही निवडसुची व्यपगत होईल. निवड समितीने तयार केलेल्या निवडसुचीमधून गुणवत्ता यादीनुसार उमेदवाराची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जाती प्रमाणपत्र/जात वैधता,प्रमाणपत्र किंवा दि.२६.१.१९५० पासून अनुसूचित क्षेत्रातील वास्तव्याचा समुचित पुरावा सादर न केल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबधित उमेदवार पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसुचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

प्रादेशिक निवड समिती,चंद्रपूर यांचेकडे निवड प्रक्रीयेबाबत अटी/शर्ती/सुचना मध्ये बदल/सुधारणा किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आले आहेत. त्रुटी निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे वेळोवेळी सुधारित आदेश निर्गमीत करण्यात येतील.

सदस्य सचिव,
प्रादेशिक निवड समिती तथा
उप वनसंरक्षक,
मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर.